# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८

दूरध्वनी : ०२२-२३०७५५३९ ई-मेल:pro@msrtc-maharashtra. in


## भरती प्रक्रियेत अवैध हस्तक्षेपाला बळी पडू नका...!

### उमेदवारांना एसटी महामंडळाचे आवाहन

मुंबई:- (६ मे)

**एस.टी. महामंडळाकडून सुरु असलेल्या चालक तथा वाहक पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवार व त्यांच्या नातेवाईकांनी प्रलोभनाला बळी न पडता निर्भीडपणे भरती प्रक्रियेला सामोरे जावे असे आवाहन एसटी महामंडळातर्फे लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना केले आहे. तसेच गेल्या ४ वर्षामध्ये एसटी महामंडळामार्फत अतिशय पारदर्शक पद्धतीने विविध पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे. महामंडळाचे अध्यक्ष, स्वतः प्रत्येक भरती प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे कोणत्याही पदाच्या भरती प्रक्रियेत वशिला इतर प्रलोभने अथवा कोणाचाही हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही. तथापि, उमेदवाराना भरती प्रक्रियेबद्दल काही शंका अथवा तक्रार असल्यास, आपल्याकडील सबळ पुराव्याच्या आधारे १८००१२१८४१४ या निःशुल्क दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून आपली तक्रार नोंद करावी, असे आवाहन एस.टी महामंडळातर्फे करण्यात येत आहे.**

२४ फेब्रुवारी २०१९ रोजी राज्याच्या २१ जिल्ह्यामध्ये सुमारे ८ हजार २२ चालक तथा वाहक पदासाठी लेखी परीक्षा पार पडली. त्यातील उत्तीर्ण उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी व शारीरिक क्षमता चाचणी प्रक्रिया सुरु असून, यापैकी पात्र उमेदवारांना संगणकीय चालन परीक्षेसाठी बोलविण्यात येणार आहे. त्यानंतर लेखी परीक्षा व संगणकीय चालन परीक्षा यांच्या संयुक्त गुण तालिकेनुसार अंतिम निवड यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तथापि, कागदपत्र पडताळणी व शारीरिक पात्रतेमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांना काही लोकांकडून नियमबाह्यरित्या काम करून अंतिम निवड यादीत नाव समाविष्ट करण्याचे आमिष दाखविण्यात येत असून त्यासाठी त्यांचेकडे लाखो रुपयांची मागणी संबंधित "एजंट" कडून करण्यात येत असल्याच्या तक्रारी एस.टी महामंडळाच्या अध्यक्षांना दूरध्वनी वरून व प्रत्यक्ष भेटून काही उमेदवार व त्यांच्या नातेवाईकांनी केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर एस.टी महामंडळाने अशा तक्रारींची गंभीर दखल घेतली आहे.सध्या सुरु असलेल्या चालक तथा वाहक पदाच्या भरती प्रक्रियेत नियमानुसार कागदपत्र पडताळणी व शारीरिक पात्रतेची चाचणी पूर्ण करण्यात येत असून कोणताही वशिला अथवा अवैध हस्तक्षेपाने उमेदवाराला भरती केले जाणार नाही. **तसेच १७,१८,१९ मे रोजी विविध वर्ग १ व २ च्या अधिकारी पदासाठी होणाऱ्या लेखी परीक्षेबाबत देखील उमेदवारांनी वशिलेबाजी, आमिष अथवा प्रलोभनाला बळी पडू नये, असे आवाहन एस.टी महामंडळातर्फे करण्यात येत आहे.**

जनसंपर्क अधिकारी

एस.टी. महामंडळ